महाराष्ट्र शासन

**समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

दूरध्वनी क्र०.२०-२६१२२७५२ ईमेल - sakalyanpuneest@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **वाचा** | १ | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या **विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.** |
| | २ | अधिसूचना शासन आदेश क्र. सकआ-२०१२/ प्र.क्र.२६३/ आस्था-२, दि. २० ऑक्टोंबर २०१२. |
| | ३ | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एस. आर. व्ही. २०१७/ प्र. क्र. ४१५/ का-१२, दिनांक ९ एप्रिल २०१८. |
| | ४ | शासन परिपत्रक एस.आर.व्ही-२०१४ / मुस-३४ प्र.क्र.३७९ /१२, दिनांक ११.२.२०१५ |
| | ५ | महाराष्ट्र शासन राजपत्र असधारण भाग चार दिनांक दिनांक २९.८.२०२४. |
| | ६ | नागरी सेवा मंडळ (२) बैठक दिनांक ३०.८.२०२४. |

क्र. सकआ /आस्था/प्र- २/ का.अ/ विनंती बदली/२०२४-२५/ का-६/पुणे, ३४७२ दि.३१. ८.२०२४.

**-: आदेश :-**

संदर्भ क्र. १ व क्र.५ नुसार बदल्यांच्या अधिनियमातील तरतुदीनुसार व संदर्भ क्र. ३ अन्वये आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याबाबतचे अधिकार प्रदान केलेले आहेत. गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांची, पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ (२) स्थापन केलेले आहे.

संदर्भ क्र. ६ अन्वये सदर नागरी सेवा मंडळाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे हे शासन आदेशानुसार प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून **कार्यालय अधिक्षक** या संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांचे **विनंती** बदलीने पदस्थापनेचे आदेश निर्गमित करीत आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व कार्यालयाचे नाव | **प्रशासकीय/विनंती** बदलीने पदस्थापनचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्रीम के. आर. ईश्वरकर,<br>कार्यालय अधिक्षक<br>जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ येथील कार्यालय अधिक्षक या रिक्त पदावर विनंती बदलीने पदस्थापना. |

वरील प्रमाणे बदली झालेल्या कार्यालय अधिक्षक यांना दिनांक ३१.८.२०२४ रोजी कार्यमुक्त करण्यात येत आहे. तसेच वरीलपैकी ज्या कर्मचारी यांची विनंतीने बदली करण्यात आलेली आहे त्यांना बदली प्रवास भत्ता व पदग्रहण अवधी लागू राहणार नाही.

सदरच्या बदली आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. बदली झालेले कर्मचारी यांना हयाच आदेशात कार्यमुक्त करण्यात आल्याने रुजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. एखादया कर्मचाऱ्यास रुजू करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षा काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधीत कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल.

२. बदली झालेल्या कर्मचारी यांनी तात्काळ बदलीच्या ठिकाणी हजर व्हावे. सदर कर्मचारी हे सदर पदावर हजर न झाल्यास त्यांचा सदरचा कालावधी सेवाखंड कालावधी म्हणून गणना करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कर्मचारी यांची राहील.

३. प्रशासकीय अथवा विनंती बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीने अथवा उसनवारी मार्गाने त्यांच्या पूर्वीच्या नियुक्तीच्या ठिकाणी किंवा कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक सोयीसाठी इतरत्र पदस्थापना देऊ नये. या प्रकारचा प्रयत्न बदलीतील अवैधता / अनियमितता समजून संबंधित कर्मचारी शिस्तभंग कार्यवाहीस पात्र होतील.तसेच कामकाज व्यवस्थचे आदेश निर्गमित करणार प्राधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र होतील.

४. बदली आदेशात बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे कर्मचारी शिस्तभंग विषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

**(ओम प्रकाश बकोरिया)**
**आयुक्त, समाज कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य,पुणे.**

<u>प्रत माहितीस्तव सादर.</u>

१.मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई ३२.

२.मा. महालेखापाल, मुंबई / नागपूर.

<u>प्रत: माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.</u>

१. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (संबंधित)

२. जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद (संबंधित)

३ कोषागार अधिकारी, (संबंधित)

४.संबंधित कर्मचारी.

**आयुक्त, समाज कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**